# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणपुणे ,पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र ,

गृहनिर्माण विभाग), महाराष्ट्र शासन(
मुख्य कार्यालय,चौथा मजला : काकडे बीझ आयकॉन ,
ई पुणे विद्यापीठ ,स्क्वेअर जवळ-रोड, अशोक नगर ,
शिवाजी नगर ,पुणे ४११०१६ -.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०२५-५७७९९९२५५७७९०० ,
ईमेल- : srapune@yahoo.in वेबसाईट :
www.srapune.gov.in

जा.क्र.झोपुप्रा/तां.३/अंभोप्र/मा.क्र.२३६/२००५/२०२३

दि. ०६/११/२०२३

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

वाचा-१) प्रथम बांधकाम परवानगी (C.C.)जा.क्र.झोपुप्रा/तां३/मा.क्र.२३६/७६५/२०२० दि.०१/७/२०२०.
२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/तां३/मा. क्र.२३६/९८०/२०२२दि.११/७/२०२२.
३) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र.झोपुप्रा/तां३/मा. क्र.२३६/११६०/२०२३दि.३०/६/२०२३.

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे स.नं. ५०० (भाग) सि.स.न. १९६६ (भाग) (कासारवाडी) भोसरी, पिंपरी चिंचवड येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र. झोपुप्रा /तां३ / मा.क्र.२३६ /११६० /२०२३ दि.३०/६/२०२३ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील तळ +१६ मजल्यावरील सदनिकेसाठी अंशतः भोगवटा पत्र मिळण्याबाबत प्रकल्पाचे विकसक मे. श्री. साईगुरु कन्स्ट्रक्शन यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार इमारतीसाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० चे नियम क्र.२.११ अन्वये अंशत: भोगवटा प्रमाणपत्र खालील प्रमाणे देणेत येत आहे.

मंजुर बांधकाम नकाशानुसार इमारतीचा अंशतः भोगवटा अदा करावयाचा तपशील खालीलप्रमाणे आहे. (पुनर्वसन इमारत)

| अ.क्र | मजले | प्रत्यक्ष मंजूर नकाश्यानुसार पुनर्वसन घटक | | एकुण सदनिका |
|---|---|---|---|---|
| | | Resi | Comm | |
| १ | ग्राउंड फ्लोअर | पार्किंग | -- | -- |
| २ | पहिला मजला | ०१ सदनिका + ०१ सोसायटी ऑफीस +०२ बालवाडी + ०१ वेल्फेअर सेंटर | -- | ०१ सदनिका + ०१ सोसायटी ऑफीस +०२ बालवाडी + ०१ वेल्फेअर सेंटर |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

06-11-2023

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | दुसरा मजला | सदनिका क्र. २०१ ते २०८. | -- | ०८ सदनिका |
| ४ | तिसरा मजला | सदनिका क्र. ३०१ ते ३०८. | -- | ०८ सदनिका |
| ५ | चौथा मजला | सदनिका क्र. ४०१ ते ४०८. | -- | ०८ सदनिका |
| ६ | पाचवा मजला | सदनिका क्र. ५०१ ते ५०८. | -- | ०८ सदनिका |
| ७ | सहावा मजला | सदनिका क्र. ६०१ ते ६०८ | -- | ०८ सदनिका |
| ८ | सातवा मजला | सदनिका क्र. ७०१ ते ७०८. | -- | ०८ सदनिका |
| ९ | आठवा मजला | सदनिका क्र. ८०१ ते ८०४ ८०६ ते ८०८ | -- | ०७ सदनिका |
| १० | नववा मजला | सदनिकाक्र. ९०१ ते ९०८. | -- | ०८ सदनिका |
| ११ | दहावा मजला | सदनिका क्र. १००१ ते १००८. | -- | ०८ सदनिका |
| १२ | अकरावा मजला | सदनिका क्र. ११०१ ते ११०८ | -- | ०८ सदनिका |
| १३ | बारावा मजला | सदनिका क्र. १२०१ ते १२०८ | -- | ०८ सदनिका |
| १४ | तेरावा मजला | सदनिका क्र. १३०१ ते १३०४ १३०६ ते १३०८ | -- | ०७ सदनिका |
| १५ | चौदावा मजला | सदनिका क्र. १४०१ ते १४०८ | -- | ०८ सदनिका |
| १६ | पंधरावा मजला | सदनिका क्र. १५०१ ते १५०८ | -- | ०८ सदनिका |
| १७ | सोळावा मजला | सदनिका क्र. १६०१ ते १६०८ | -- | ०८ सदनिका |
| | एकूण | ११९ | -- | ११९ सदनिका |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

पुनर्वसन घटक :- ११९ सदनिका + ०१ सोसायटी ऑफीस + ०२ बालवाडी + ०१ वेल्फेअर सेंटर

प्रस्तुत प्रकरणी नकाशावर हिरव्या रंगाने केलेल्या दुरूस्तीनुसारखालील नमूद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) विषयांकित इमारतीस योग्य प्रकारची आणि इमारतीच्या बाहेरच्या मोकळया बाजूस उघडणारी लीफ्ट व जीना मंजूर नकाशाप्रमाणे बांधलेली आहे. तसेच मंजूर नकाशानुसार Refuge Area इमारतीमध्ये ८व्या व १३ व्या मजल्यावर तरतुद केली आहे.

२) विषयांकित योजना क्षेत्रासाठी मंजूर नकाशानुसार पुर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर बाजूस सिमाभिंत बांधण्यात आली आहे.

३) मंजूर नकाशानुसार स्कुटर पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे.

४) मंजूर नकाशानुसार सोसायटी ऑफिस टॉयलेटसह मंजुर नकाशानुसार इमारतीकरिता पाण्याची टाकी/व्हेंटीलेशन डक्ट/जिने/लिफ्ट/पाईप फिटींग इ. बाबी योग्य प्रकारे पुर्ण केलेल्या आहेत.

५) इमारतीच्या उत्तर व पूर्व बाजूंनी असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) कोणत्याही अडथळ्याशिवाय पुर्णपणे खुले आहे.

६) योजनेतील पुनर्वसन घटक बांधकाम क्षेत्रानुसार इमारतीकरिता पायाभूत सुविधा शुल्क व देखभाल शुल्क हिशोबीत केले प्रमाणे सदरची रक्कम रु ८०,०२,१२९/-चलन क्र.०७७५ दि.३१/१०/२०२३ रोजी भरणा करणेत आली आहे.

७) योजनेतील इमारतीमध्ये असलेल्या Lift, Pump, STP, Generator Backup, Fire Fightening इत्यादीबाबत सदनिका / इमारतीचा ताबा दिल्यापासुन ५ वर्षांकरिता वार्षिक देखभाल करारनामा (AMC)करणे बंधनकारक राहिल.

८) सदरचे अंशत: भोगवटा प्रमाणपत्र हे फक्त तळ +१६ मजल्यासाठीच देण्यात येत आहे.

९) सदरच्या भूखंडातील डी.पी रस्त्यामध्ये अस्तिवातील झोपडीधारक असल्याने अग्निशमन विभागाने Fire Noc दिलेली नाही.

१०) सदर इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्याशिवाय सोडत पद्धतीने सदनिकांचे वाटप करून रस्त्यामधील झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीमध्ये स्थलांतरण करता येत नसल्याने Fire Noc शिवाय सदरचे अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

११) सदर इमारतीमध्ये अग्निशमनाबाबत काही समस्या अथवा दुर्घटना झाल्यास त्याची सर्वस्वी जबादारी विकसकाची राहील.

१२) सदर योजनेच्या इमारतीस लागू असलेल्या मंजूर विकास योजनेचा १२.०० मी. रुंद रस्त्यावरील झोपडीधारकांना जागेवरून काढून रस्ता करून तेथील झोपडीधारकांना पुनर्वसन इमारतीत सदनिकेचा ताबा दिलेनंतर अंतिम भोगवटा अदा करणेपूर्वी Final Fire NOC आज पासून ४ महिन्यांच्या आत देणे विकसक यांचेवर बंधनकारक राहील.

१३) सदर योजनेसाठी Fire Noc प्राप्त झाल्यानंतर योजनेतील भोगवटा दिलेपोटीचा टीडीआर अदा करणेत येईल.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

06-11-2023

१४) प्रकल्पा अंतर्गत योजना क्षेत्रातील खुली जागा आणि सार्वजनिक सुविधा सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

१५) सदर झोपडपट्टी योजनेतील इमारतीमधील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडत पद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

१६) विकसक यांनी इमारतीमध्ये प्रस्तावित करणेत आलेली उपकरणे / व्यवस्था कार्यान्वीत असल्याचे प्रात्यक्षिक (Demo)ताब्याच्या वेळी दाखवणे बंधनकारक राहिल.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे
दि. ०१/११/२०२३ रोजीचे मान्यतेने

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

06-11-2023

प्र.सहायक संचालक नगररचना,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरीवड क्षेत्रचिंच-, पुणे

प्रत:-१) मे. श्री. साईगुरु कन्स्ट्रक्शन

ऑफिस नं. ५२-९ & ५२-१०, हॉटेल डेक्कन पविलीयन, नवले ब्रीज जवळ पुणे ४११०४७

२) तहसिलदार, ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव अग्रेषित.

३) संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.